WCEM NEWS 2021

लोकमत

# इंडस्ट्रीयल ऑटोमेशनवर कार्यशाळेचे आयोजन



नागपूर : वैनगंगा अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या इलेक्ट्रीकल तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातर्फे इंडस्ट्रीयल ऑटोमेशनवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. 'इंट्रोडक्शन टू पीएलसी अँन्ड एससीएडीए' हा कार्यशाळेचा विषय होता. 'इलेक्ट्रॉनिक्स टेलिकम्युनिकेशन स्टुडंट्स असोसिएशन' व 'इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन'तर्फे हा पुढाकार घेण्यात आला होता. या विषयातील तज्ज्ञ दिनेश निंबाळकर यांनी यावेळी मार्गदर्शन केले. इंडस्ट्रीअल ऑटोमेशनमध्ये 'पीएलसी' व 'एससीएडीए'चा कशा पद्धतीने वापर होऊ शकतो यावर त्यांनी प्रकाश टाकला. सोबतच या तंत्रज्ञानाचे नेमके काम कसे होते व कुठे याचा उपयोग होतो याबाबतदेखील त्यांनी माहिती दिली. उद्योगक्षेत्रातील याच्या महत्त्वावरदेखील त्यांनी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख डॉ. नीता ठुने यांच्या पुढाकाराने हे आयोजन झाले. यावेळी प्रा.तृप्ती ठाकरे, प्रा.युवराज चव्हाण, प्रा.अंकिता खंडाईत प्रामुख्याने उपस्थित होते.

Hello Nagpur
Page No. 3 Nov 24, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# 'आयपीआर'वर 'ऑनलाईन' कार्यशाळेचे आयोजन

## डॉ. बी. के. सरकार यांनी केले मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : वैनगंगा अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातर्फे 'आयपीआर पेटंट अ‍ॅन्ड डिझाईन प्रोसेस'वर ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. 'इलेक्ट्रिकल' व 'इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड टेलिकम्युनिकेशन' विभागांतर्गत 'इलेक्ट्रॉनिक्स टेलिकम्युनिकेशन स्टुडन्ट्स असोसिएशन' तसेच 'इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन'तर्फे हे आयोजन करण्यात आले.

सिंगापूर येथे डॉ. बी. के. सरकार यांनी यासंदर्भात व्याख्यान दिले. यावेळी केंद्र शासनाच्या 'आत्मनिर्भर भारत' या मोहिमेची माहितीदेखील दिली. पेटंटची कल्पना कशा पद्धतीने एखाद्या उत्पादनात परिवर्तित होऊ शकते, यावर त्यांनी मार्गदर्शन केले. शिवाय पेटंट नोंदणी तसेच कॉपीराईटच्या प्रक्रियेवरदेखील त्यांनी प्रकाश टाकला. विभागप्रमुख डॉ. नीता ठुने यांच्या संकल्पनेतून हे आयोजन झाले. यावेळी प्रा. तृप्ती ठाकरे, प्रा. मोना वानखेडे उपस्थित होत्या.

Hello Nagpur
Page No. 5 Oct 30, 2021
Powered by: erelego.com

तरुण भारत
Apla Nagpur | 2021-11-17 | Page- 3
epaper.tarunbharat.net

# वैनगंगा महाविद्यालयातर्फे प्रकल्प भेट




वैनगंगा अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे राबविण्यात आलेल्या 'इंजिनिअरिंग इन कम्युनिटी सर्व्हिसेस'च्या अंतर्गत यांत्रिकी (मेकॅनिकल) विभागाने बनविलेला 'डिझाईन अँड फेब्रिकेशन ऑफ ग्रीन डस्टबिन फॉर वेस्ट मॅनेजमेंट' हा प्रकल्प नामदेवराव आम्नेरकर (वागदरा) यांना भेट देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रकल्पामुळे पर्यावरणातील जैवकचऱ्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असे महाविद्यालयातील प्रा. स्वप्नील चौधरी यांनी त्या प्रकल्पाबद्दल मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. भरत छेडे, प्रा. प्रफुल्ल पुरी, प्रा. स्वप्नील चौधरी, प्रा. नितीन सावरकर, कार्यशाळा शिक्षक शिवशंकर जयस्वाल, रोशन आमनेरकर, संजय मोटघरे, गोपाल चौधरी, जय टेंभरे आदी उपस्थित होते.

Powered by iDocuments

लोकमत

# प्लेसमेन्ट ड्राईव्हला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद




नागपूर : औरंगाबाद येथील ऑटोमोबाइल कंपनीतर्फे आयोजित प्लेसमेन्ट ड्राईव्हला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. या ड्राईव्हमध्ये वैनगंगा अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील विद्युत तसेच यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील चौदा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. याशिवाय इतर विद्यार्थ्यांना यावेळी तज्ज्ञांतर्फे मार्गदर्शनदेखील करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भरत चेडे, प्रा. युवराज चव्हाण, प्रा. स्वप्निल चौधरी, प्रा. मोहित चाचेरे, प्रा. गुरूदेव सावरकर, प्रा. आशिष बनसोड, अक्षय धोटे आणि प्रा. रवींद्र राऊत प्रामुख्याने उपस्थित होते.

Hello Nagpur
Page No. 3 Nov 30, 2021
Powered by: erelego.com